# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक ३९

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **शुक्रवार दिनांक १४/११/२०२५ दुपारी १२-३० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्री नितीन कापडणीस यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्री नितीन कापडणीस | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्री किशोर सुडके | सहा. आयुक्त |
| ३. | श्री शाहेद शेख मो. शेख | मुख्य लेखापरीक्षक |
| ४. | श्री बाळासाहेब तट्टु | मुख्य लेखाअधिकारी |
| ५. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ६. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ७. | श्री वर्षा घुगरी | कार्य. अभियंता बांधकाम |
| ८. | श्री नवनित सोनवणे | कार्य. अभियंता पा.पु. |
| ९. | श्री प्रदीप चव्हाण | कार्य.अभियंता |
| १०. | श्रीमती संपदा कुलकर्णी | प्र. आरोग्य अधिकारी |
| ११. | श्री राजेंद्र माईनकर | प्र. भांडारपाल |
| १२. | श्री संजय मोरे | कार्या.अधिक्षक आस्थापना विभाग |
| १३. | श्री चंद्रकांत मोरे | प्र. लेखापाल लेखा विभाग |
| १४. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १५. | श्री एन.के. बागुल | उप अभियंता, विद्युत विभाग |
| १६. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता, नगररचना |
| १७. | श्री मधुकर निकुंभे | मालमत्ता व कर विभाग |
| १८. | श्री प्रसाद जाधव | अतिक्रमण अधिक्षक |
| १९. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २०. | श्री रविकिरण पाटकरी | वृक्ष अधिकारी |
| २१. | श्री गणेश सुर्यवंशी | लिपीक शिक्षण मंडळ |
| २२. | श्रीमती मिना सातभाई | समाज विकास अधिकारी |
| २३. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २४. | लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २५. | गणेश खोंडे | प्रकल्प विभाग |
| २६. | दुष्यंत महाजन | अग्निशमन विभाग |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-६१० मागील प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ३६, ३७ व ३८ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५८८ दिनांक १४/११/२०२५**

प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ३६ दिनांक २०/०८/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५४४ ते ५५५ क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ३७ दिनांक ०९/१०/२०२५च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५५६ ते ५८२ अखेर क्रमश:वाचून कायम करणेस मान्यता देण्यात येत आहे.

तसेच प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ३८ दिनांक १०/१०/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५८३ ते ५८७ अखेर क्रमश:वाचून कायम करणेस मान्यता देण्यात येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/-** x x x
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६११ प्रभाग क्रमांक.१ मधील द्वारका नगर, हजारे कॉलनी, तिरुपती नगर व एकता नगर येथे पाईप लाईन दुरुस्त करणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्य. अभियंता प्रभाग क्र. १ मधील व्दारकानगर, हजारे कॉलनी, तिरुपतीनगर, व एकतानगर येथे पाईपलाईनमध्ये लिकेजेस आढळुन आले. त्याची तातडीने दुरुस्ती आवश्यक होती. सदरचे काम विनानिविदा ठेकेदार श्री निखील गोसावी यांच्याकडुन करुन घेण्यात आले आहे. कार्योत्तर मान्यतेस्तव मे. स्थायी समितीसमोर विषय सादर करण्यात आला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात तुम्ही दोन प्रकारे काम करु शकला असता. खर्च ३ लाखाच्या आतअसल्यावर दरपत्रके मागवावी लागतात. शासनाने जरी ७ दिवसाची मुदत दिली तरी अत्यावश्यक असल्यामुळे तुम्ही विशेष परवानगीने हातोहात दर पत्रके घेवुन हे काम करु शकला असता. यात रेट कॉन्ट्रॅक्ट नाही केले का.

मा.कार्य.अभियंता हो आहेतआपण त्यात छोटया दुरुस्ती करतो.

मा.आयुक्त तथा प्रशासक यापुढे असे छोटे खर्च असतील तर तुम्ही हातोहात दर पत्रक काढून खुपच इर्मजन्सी असेल तर काम करावे. यापुढे कार्योत्तर मान्यता हा प्रकार स्थायी समितीमध्ये ठेवु नये.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५८९ दिनांक १४/११/२०२५**

प्रभाग क्रमांक.१ मधील द्वारका नगर, हजारे कॉलनी, तिरुपती नगर व एकता नगर येथे पाईप लाईन दुरुस्त करणे. उक्तबाबत संबधित भागातील क. अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता विविध ठिकाणी लिकेजेस आढळून आले. उक्त परिसरात पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी पाणीपुरवठा करणाऱ्या पाईप लाईन वरील लिकेजेस काढणे गरजेचे आहे.

सदर कामासाठी शासन दरसूची/म.जी.प्रा.विभाग/२०२३-२४ नुसार अंदाजपत्रकीय रक्कम **रु. १,८१,००१/-** मात्र खर्च अपेक्षित आहे.सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार **पाईप लाईन दुरुस्ती** निधीतुन कामासाठी **रू. २.०० कोटी** मात्र तरतूद आहे. सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम **रु. १,८१,००१/-** चा खर्च अपेक्षित असून सदरचे काम विना निविदा **श्री. निखील**

**राजेंद्र गोसावी, ठेकेदार** यांच्या कडून करून घेणास व कार्योत्तर मंजुरी करिता प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार प्रभाग क्रमांक.१ मधील द्वारका नगर, हजारे कॉलनी, तिरुपती नगर व एकता नगर येथे पाईप लाईन दुरुस्त करणेकामी झालेल्या खर्च रुपये **१,८१,००१/- मात्रला** कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

यापुढे तातडीची कामे दरपत्रक मागवून करण्यात यावी. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) या नियमांतर्गत कार्योत्तर मान्यतेची कामे प्रस्तावित करु नये. तातडीच्या कामासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ मधील २ (२) या नियमांतर्गत उचित कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६१२ प्रभाग क्रमांक. २ मधील पोतदार शाळा आणि नगाव बारी येथे HDPE पाईप लाईन दुरुस्त करणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्य. अभियंता — प्रभाग क्रं.२ मध्ये पोतदार शाळा आणि नगावबारी हा जो भाग आहे. येथे पाईपलाईन फुटली होती यातुन कुठलाही पाणी पुरवठा होत नव्हता. तेथे आपण काही भागात पाईपलाईन अमृत २ अंतर्गत टाकल्या होत्या सदर लाईन रस्ता दुरूस्ती वेळी खराब झाल्यामुळे अचानक उदभवलेली बाब म्हणुन तात्काळ दुरुस्ती करावी लागली. सदर काम विनानिविदा करुन घेण्यात आहे. हे काम देखील ठेकेदार निखील गोसावी यांच्याकडुन करुन घेण्यात आले. मान्यतेस्तव मे. स्थायी समिती समोर सादर. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक — सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५९० दिनांक १४/११/२०२५**

प्रभाग क्रमांक. २ मधील पोतदार शाळा आणि नगाव बारी येथे HDPE पाईप लाईन दुरुस्त करणे. उक्तबाबत संबधित भागातील क. अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता पाईप लाईन गळती होत असल्यामुळे पाईप लाईन वरील लिकेज काढणे गरजेचे आहे.

सदर कामासाठी शासन दरसूची/म.जी.प्रा.विभाग/२०२३-२४ नुसार अंदाजपत्रकीय रक्कम **रु. २,९२,२९३/-** मात्र खर्च अपेक्षित आहे.सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार **पाईप लाईन दुरुस्ती** निधीतुन कामासाठी **रू. २.०० कोटी** मात्र तरतूद आहे. सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम **रु. २,९२,२९३/-** चा खर्च अपेक्षित असून सदरचे काम विना निविदा **श्री. निखील राजेंद्र गोसावी, ठेकेदार** यांच्या कडून करून घेणास व कार्योत्तर मंजुरी करिता प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, प्रभाग क्रमांक. २ मधील पोतदार शाळा आणि नगाव बारी येथे HDPE पाईप लाईन दुरुस्त करणेकामी झालेल्या खर्च रुपये **२,९२,२९३/- मात्रला** कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

यापुढे तातडीची कामे दरपत्रक मागवून करण्यात यावी. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) या नियमांतर्गत कार्योत्तर मान्यतेची कामे प्रस्तावित करु नये. तातडीच्या कामासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ मधील २ (२) या नियमांतर्गत उचित कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६१३ धुळे शहातील कचरा संकलन करणे कामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता आरोग्य विभागामार्फत शहरातील घरगुती व व्यावसायीक तसेच सार्वजनिक ठिकाणांवरील कचरा संकलन व वाहतुक करण्याचे काम करण्यात येत होते. परंतु विद्यमान कचरा संकलन ठेकेदारामार्फत संबंधीत कामे नियोजीत वेळेत व समाधानकारक रीतीने पार पाडली जात नसल्याने शहरात कचरा साठला होता. तसेच मोठया प्रमाणात तक्रारी वाढल्या होत्या. तत्कालीन आयुक्तांनी ट्रॅक्टर लावुन कचरा संकलन वाहतुकीसाठी आदेशीत केल्यानुसार ७ दिवसाकरीता ट्रॅक्टरची व्यवस्था केली होती. शासकीय दरसुचीनुसार रु. २,०५,९१२/- इतका खर्च झाला आहे. सदरचे काम विनानिविदा करुन घेण्यात आहे. कार्योत्तर मान्यतेस्तव विषय मे. स्थायी समितीसमोर सादर केला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक हा दर कंत्राटदाराला पेमेंट करतो त्याप्रमाणे आहे का.

मा.उपअभियंता कंत्राटदाराच्या रेट पेक्षा कमी दर आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक त्या काळात काही बिले अदा केली नाहीत ना. मग त्याने काम बंद ठेवले तर दंडाची प्रोव्हिजन काय.

मा. मु. स्व. निरीक्षक त्या काळात बिले अदा केली नाही. रु. ५००/- दंडाची प्रोव्हिजन आहे. प्रति दिवस.

मा.आयुक्त तथा प्रशासक खात्री करुन सांगा त्याकाळात दंड वसुल केला आहे का. सदरचा विषय मंजुर करण्यात येत आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५९१ दिनांक १४/११/२०२५**

धुळे महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत शहरातील घरगुती, व्यावसायिक तसेच सार्वजनिक ठिकाणांवरील कचरा संकलन व वाहतूक करण्याचे काम करण्यात येत होते. परंतु विद्यमान कचरा संकलन ठेकेदारामार्फत संबंधित कामे नियोजित वेळेत व समाधानकारक रीतीने पार पाडली जात नसल्याने नागरिकांकडून कार्यालयात मोठ्या प्रमाणावर तक्रारी प्राप्त होत होत्या.

या दरम्यान शहरातील कचरा उचलणे आवश्यक असल्याने मा.आयुक्त तथा प्रशासक, धुळे महानगरपालिका यांनी मौखिक सुचनेनुसार बांधकाम विभागामार्फत तात्पुरत्या स्वरूपात कचरा संकलन व वाहतूक कार्य हाती घेण्याचे निर्देश दिले आहेत.

राज्य दरसूची सन २०२३-२४ नुसार ट्रॅक्टरचा प्रती तास दर रु.३९८/- असून ८ तासा करिता (१ दिवस) एकूण रु.३,१८४/- इतका खर्च येतो. तसेच ड्रायव्हरसाठी प्रती दिवस रु.६७७/- दर मंजूर आहे. त्यानुसार, संबंधित ठेकेदार मे. राम कन्स्ट्रक्शन, धुळे यांच्याशी दरवाटाघाटी करण्यात येऊन ट्रॅक्टरचा दर ८ तासाकरिता (१ दिवस) रु.३,०००/- प्रमाणे निश्चित करण्यात आलेला आहे.

सदर प्रमाणे दि.०६/१०/२०२५ ते दि.१२/१०/२०२५ या कालावधीत एकूण ७ दिवसात प्रती दिवस ०८ ट्रॅक्टर व ०८ ड्रायव्हरचा उपयोग करण्यात आलेला आहे. त्यानुसार , ट्रॅक्टर भाडे रु.१,६८,०००/- व ड्रायव्हर वेतन रु.३७,९१२/- असा एकूण रु.२,०५,९१२/- इतका खर्च आलेला आहे.

वरील काम हे तातडीचे व सार्वजनिक हिताचे असल्याने मे.राम कन्सट्रक्शन , धुळे यांच्या मार्फत मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७ (३)(क) अन्वये त्वरित काम करण्यास तसेच कलम ५(२)(२) अन्वये विना निविदा पद्धतीने काम करण्यास कार्योत्तर मंजुरी मिळविण्याकरिता, अंदाजपत्रकीय खर्च रु.२,०५,९१२/- मात्र मंजुरीसाठी हा विषय मे.स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे शहातील कचरा संकलन करणे कामी झालेला खर्च रु.२,०५,९१२/- मात्रला कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

यापुढे तातडीची कामे दरपत्रक मागवून करण्यात यावी. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) या नियमांतर्गत कार्योत्तर मान्यतेची कामे प्रस्तावित करु नये. तातडीच्या कामासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ मधील २ (२) या नियमांतर्गत उचित कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६१४ बाभळे पाणी पुरवठा केंद्र येथील 3 MVA ट्रान्सफोर्मर दुरुस्ती, आईल फिल्टरेशनसह कार्यान्वित करणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता (वि) तापी पाणीपुरवठा योजनेवर आपले सुकवद व बाभळे येथे दोन पंपींग स्टेशन आहे. सदर दोन्ही ठिकाणी ३३ केव्ही सबस्टेशन आहे. हे सबस्टेशन १९८९-९० च्या दरम्यान कार्यान्वित झाले आहे. तर बाभळे येथील सबस्टेशन आहे. ३०/०८/२०२५ रोजी पावसामुळे फेल झाले. आपल स्टॅण्डबाय ट्रान्सफॉर्मर देखील आधिपासुन बंद होता. आपण इमर्जन्सीने सदरचे काम केले. पॉवर सप्लाय मुळे तापी पाणीपुरवठा योजना बंद होती. आपण जो ट्रान्सफॉर्मर दुरुस्त केला त्याचे ऑईल फिल्टरेशन व टॉप अप करुन हे काम तातडीने करुन घेतले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक याचे रेट कॉन्ट्रॅक्ट नाही का.

मा.उपअभियंता या कामाचे नाही आहे. आपण इतर कामे करतो जसे मोटार वाईंडींग, पंप रिपेअर वगैरे याचे रेट कॉन्ट्रॅक्ट आहे. त्याची AMC केली आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक रेट कसे घेतले आहे यामध्ये

मा.उपअभियंता CSR रेट आहे यात.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५९२ दिनांक १४/११/२०२५**

तापी पाणी पुरवठा योजनेच्या बाभळे जलशुद्धीकरण केंद्र येथीळ 33 KV सबस्टेशन मधील 3 MVA (3000 KVA) ट्रान्सफोर्मर शनिवार दि. ३०/०८/२०२५ रोजी पहाटे फॉल्ट होवून बंद झाला त्यामुळे तापी पाणी पुरवठा योजनेवरील पाणी पुरवठा बंद झाला.

दि. ३०/०८/२०२५ रोजी सदर ट्रान्सफोर्मरची तपासणी केली असता, सदर ट्रान्सफोर्मरचा 33KV H.T. side/L.T. एक फेज शॉर्ट आल्याचे निदर्शनास आले. सबब सदर ट्रान्सफोर्मर हा नादुरुस्त झाला, पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक असल्याने बाभळे सबस्टेशन मधील अन्य 3 MVA ट्रान्सफोर्मर कार्यान्वित करणेची तपासणी करण्यात आली.

सदरील standby ट्रान्सफोर्मर सुमारे १३ वर्षांपासून विना वापर होता त्यामध्ये आईल हि खराब झालेले होते तसेच HT side bushing बदलणे तसेच सध्यस्थितील सबस्टेशन मधील आयसोलेटर, डी. ओ. सेट ई. सर्विसिंग करणे, ट्रान्सफोर्मर ओईल सुमारे २००० लिटर चे फिल्टरेशन करणे ई. कामे तातडीने करून घेणे अनिवार्य होते. सदर कामे पूर्ण तपासणी नुसार मे. मोहिनीराज ईलेक्ट्रीकॅल्स, धुळे यांचे कडून तातडीने पूर्ण करण्यात आली. संपूर्ण दुरुस्तीसह सदरील 3 MVA ट्रान्सफोर्मर दि. ३१/०८/२०२५ रोजी रात्री ११:०० वाजता चाचणी घेवून कार्यान्वित करण्यात आला व रात्री उशिरा तापी पाणी पुरवठा योजनेवरून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला.

उक्तप्रमाणे तापी पाणी पुरवठा योजने वरील पाणी पुरवठा सुरळीत चालू करणे करीता सदर काम अत्यंत तातडीने शासन दरसूची सा.बा. विभाग व म.जि.प्रा. यांच्या दरानुसार केलेले कामांच्या बाबी प्रमाणे रक्कम रुपये १,९८,००७/- मात्र असून सदरचे काम हे विना निविदा मे. मोहिनीराज ईलेक्ट्रीकल्स, धुळे यांच्या कडून करून घेण्यात आले. त्यानुसार सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, बाभळे पाणी पुरवठा केंद्र येथील 3 MVA ट्रान्सफोर्मर दुरुस्ती, आईल फिल्टरेशनसह कार्यान्वित करणेकामी झालेला खर्च रुपये १,९८,००७/- मात्रला कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

यापुढे तातडीची कामे दरपत्रक मागवून करण्यात यावी. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) या नियमांतर्गत कार्योत्तर मान्यतेची कामे प्रस्तावित करु नये. तातडीच्या कामासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ५ मधील २ (२) या नियमांतर्गत उचित कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६१५ — धुळे मनपा हद्दीत प्र.क्र. १८ मधील अवधान अमरधाम विकसित करणेकामी निविदा दर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता — धुळे मनपा हददीत प्र.क्र. १८ मधील अवधान अमरधाम नादुरुस्त झालेले होते. सदरकामी ई निविदा मागविण्यात येवुन त्यात ३ निविदाधारकांनी भाग घेतले होते. त्यात अंकित किशोर भंडारी यांची अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी दराची निविदा आली होती. सदर दरास मंजुरीस्तव मे. स्थायी स्थायी समितीपुढे सादर करण्यात आले आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक — यात बजेटमध्ये तरतुद आहे का. यात कोणती कोणती कामे घेतली आहे.

मा.उपअभियंता — बजेटमध्ये प्रोव्हिजन आहे. यात ओटे, वॉल कंपाऊंड व शेड याची कामे आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५९३ दिनांक १४/११/२०२५**

धुळे मनपा हद्दीत प्र.क्र. १८ मधील अवधान अमरधाम विकसित करणे कामास म.आयुक्त तथा प्रशासक सो., यांच्या दि. १७/०७/२०२५ रोजीच्या टिपणी मान्यतेने उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.१,२४,९९,५३४/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ ८७ /२०२५-२६ दिनांक १७/०७/२०२५ अन्वये रक्कम रु. १,२४,४०,१९७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. उक्तबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| व १ | अंकित किशोर भंडारी | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| री २ | एकविरा कन्सट्रक्शन | शे.३.००% जास्तीने | |
| ल ३ | दिपेश सुभाषकुमार लिलवाणी | शे.४.००% जास्तीने | |

प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून **अंकित किशोर भंडारी धुळे** यांचे दर **अंदाजपत्रकीय दराने** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार **अंकित किशोर भंडारी, धुळे** यांची **अंदाजपत्रकीय दराने** आलेले निविदा दर मंजुरी कामी प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे मनपा हद्दीत प्र.क्र. १८ मधील अवधान अमरधाम विकसित करणेकामी **अंकित किशोर भंडारी, धुळे** यांच्या आलेले **अंदाजपत्रकीय दरास** मान्यता देणेत येत आहे.

सदर कामाबाबत अंदाजपत्रकीय तरतुद तपासुन घेण्यात यावी. व त्यानुसार पुढील कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६१६ धुळे महानगरपालिके चे 12 ॲलोपॅथी दवाखाने, 3 सुतिकागृह, 1 कुटुंब कल्याण केंद्र, 1 नागरी आरोग्य केंद्र (एकुण 17 दवाखाने) यासाठी सन 2025-26 या वर्षासाठी लागणारी औषधे खरेदीसाठी ई निविदेत आलेले दर मान्यतेसाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.प्र. वै. अधिकारी धुळे मनपाचे १२ ॲलोपॅथी, ३ सुतिकागृह, १ कुटुंबकल्याण केंद्र, १ नागरी आरोग्य केंद्र असे १७ दवाखाने आहेत.यासाठी २०२५-२६ या वर्षासाठी औषध खरेदी व स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळणेसाठी वृत्तपत्रात ई निविदा सुचना प्रसिध्द केल्या होत्या. यात ४ निविदा धारकांनी भाग घेतला होता. सन २०२५-२६ या वर्षात अंदाजपत्रकात रु. १,५०,००,०००/- तरतुद आहे. ई निविदा प्रणालीव्दारे आलेल्या दरांप्रमाणे १०३ प्रकारचे औषध खरेदीसाठी खर्च रु. ३१,३५,८८४/- मात्र येणार आहे. उक्त खर्चास व तुलनात्मक कामी असलेल्या दराप्रमाणे खरेदीसाठी विषय मे. स्थायी समितीपुढे सादर केला आहे. . विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात मागील साठा आहे का.

मा. प्र. वै. अधिकारी मागील साठा आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात तुम्ही दर कसे निश्चीत केले होते. निश्चीत केलेल्या दरांचा बेस काय होता.

मा. मु.ले. परीक्षक यात शेवटची खरेदीचा रेफरंस पकडायला पाहिजे आणि त्यामुळे बिलो की अबव्ह हे पाहायला पाहिजे. दुसरे असे की, जे पुरवठाधारक आहे. कंपनी आपण नमुद करतो परंतु कंपनी ते नमुद करत नाही. यामुळे एका पातळीवर तुलना होत नाही. सर्व जर जनरीक असेल तर अडचण नाही. यामध्ये तुलना करतांना अडचणी येतात.

मा.आयुक्त तथा प्रशासक तुलनात्मक तक्ता सादर करावा यातुन अबव्ह व बिलो हे समजले पाहिजे. मग हा विषय मान्य करु तोपर्यंत सदर विषय तहकुब ठेवण्यात यावा.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५९४ दिनांक १४/११/२०२५**

धुळे महानगरपालिके चे 12 ॲलोपॅथी दवाखाने, 3 सुतिकागृह, 1 कुटुंब कल्याण केंद्र, 1 नागरी आरोग्य केंद्र (एकुण 17 दवाखाने) यासाठी सन 2025-26 या वर्षासाठी लागणारी औषधे खरेदीसाठी ई निविदेत आलेले दर मान्यतेसाठी प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झाला असता, प्रस्तावात नमुद औषधींच्या दरांबाबत तुलनात्मक तक्ता व स्वयंस्पष्ट अहवाल पुढील स्थायी समितीपुढे सादर करावा. तोपावेतो सदर प्रस्ताव तहकूब ठेवणयात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६१७ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी अहवाल स्थायी समितीस अवलोकनार्थ सादर.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.मु.ले.परीक्षक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) नुसार लेख्यांची तपासणी केली आहे. सप्टेंबर २०२५ या संपुर्ण महिन्याची हि तपासणी आहे. त्यात काही विभागांची माहिती मागवुन लेखे तपासले आहे. त्यात पाणी पुरवठा विभागाकडुन काही माहिती मागविली होती ती अद्याप त्यांनी दिलेली नाही. बऱ्याच वेळेस असे दुर्लक्ष होते. परंतु माहिती मागवुन विभागांकडुन प्रतिसाद मिळत नाही. याकडे लक्ष द्यावे. तसेच जे खुलासे असतात माहिती ती तातडीने मिळावी. यापुढील विषय याच प्रकारचा आहे. त्यात ऑक्टोबर २०२५ चे संपुर्ण महिन्याचे साप्ताहिक अहवाल आहे. यात आरोग्य विभागाचे लेखे तपासले त्यातही बऱ्याचशा हाफ मार्जिन आहे. त्यांनी अद्याप स्पष्टीकरण व खुलासा सादर केलेला नाही. लेखापरिक्षणात हिच अपेक्षा असते की ज्या ज्या बाबी निदर्शनास येतात त्यावेळेस त्या त्या बाबींची पुर्तता त्याच वेळेस झाली तर तो आक्षेप शक्यतोवर येत नाही व त्यावेळेस करेक्शन होते.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात मुददे छोटे आहेत. संबंधीत विभागाने गांभीर्याने काम करणे गरजेचे आहे. नाहीतर लेखा परिक्षणात आक्षेप कायम राहिल. वेळ व लक्ष देवुन संबंधीत विभागाने पुर्तता करावी. तसेच शासनाने जे ऑडीट पॅरा पेंडींग असतील तर इलेक्शन नंतर त्याचे स्पेशली कॅम्प घेवुन ते निकाली काढु पण यापुढे चुका होणार नाही याची संबंधीत विभागांनी दक्षता घ्यावी. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५९५ दिनांक १४/११/२०२५**

महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०५(१) अन्वये विहीत करण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी दि. ०१/०९/२०२५ ते दि. ०५/०९/२०२५ पर्यत तसेच दि.०८/०९/२०२५ ते दि. १२/०९/२०२५ तसेच दि. १५/०९/२०२५ ते दि. १९/०९/२०२५ पर्यंत तसेच दिनांक २२/०९/२०२५ ते दि. ३०/०९/२०२५ पर्यंत तपासणी करण्यांत आलेली आहे.

त्यानुसार मा. लेखा परीक्षक यांच्या मार्फत उक्त कालावधीत झालेल्या साप्ताहिक तपासणी लेख्यांचा अहवाल मे.स्थायी समिती समोर वाचून सादर करण्यांत आला. या अहवालातील निष्कर्षानुसार लेखा परिक्षण विभागाने सादर केलेल्या अर्धसमास पत्रांबाबत तातडीने अनुपालन करण्याबाबत दक्षता घ्यावी.

याबाबत मुख्य लेखाधिकारी यांनी संबंधित विभागांकडून अनुपालनाबाबत आवश्यक ती पूर्तता करावी. तसेच याबाबत लेखापरीक्षण विभागाने संबंधित विभागांशी समन्वय ठेऊन कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६१८ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी अहवाल स्थायी समितीस अवलोकनार्थ सादर.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५९६ दिनांक १४/११/२०२५**

महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०५(१) अन्वये विहीत करण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी दि. ०१/१०/२०२५ ते दि. १०/१०/२०२५ पर्यत तसेच दि. १३/१०/२०२५ ते दि. १७/१०/२०२५ तसेच दि. २०/१०/२०२५ ते दि. २४/१०/२०२५ पर्यंत तसेच दिनांक २७/१०/२०२५ ते दि. ३१/१०/२०२५ पर्यंत तपासणी करण्यांत आलेली आहे.

त्यानुसार मा. लेखा परीक्षक यांच्या मार्फत उक्त कालावधीत झालेल्या साप्ताहिक तपासणी लेख्यांचा अहवाल मे.स्थायी समिती समोर वाचून सादर करण्यांत आला. या अहवालातील निष्कर्षानुसार लेखा परिक्षण विभागाने सादर केलेल्या अर्धसमास पत्रांबाबत तातडीने अनुपालन करण्याबाबत दक्षता घ्यावी.

याबाबत मुख्य लेखाधिकारी यांनी संबंधित विभागांकडून अनुपालनाबाबत आवश्यक ती पूर्तता करावी. तसेच याबाबत लेखापरीक्षण विभागाने संबंधित विभागांशी समन्वय ठेऊन कार्यवाही करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६१९ मानधनावरील कनिष्ठ अभियंता यांना ६ महिने कालावधी करीता मुदतवाढ मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्या. अधिक्षक मानधनावरील कनिष्ठ अभियंता यांनी मुदत संपल्याच्या दिनांकापासुन ५ दिवसांचा खंड देवुन एकत्रित पुढील ६ महिन्याकरीता महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम ५३(३) नुसार मुदतवाढ देणेबाबतचा विषय मे. स्थायी समितीपुढे निर्णयार्थ सादर केला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक यापैकी कोणी दिर्घकाळ रजेवर होते का. विभाग प्रमुखांचा अहवाल आहे का.

मा.कार्या. अधिक्षक यात आपण संबंधीत विभाग प्रमुखांचा अहवाल घेवुनच सादर करतो.

मा. आयुक्त तथा प्रशासक ५ दिवसांचीसेवा खंड देवुन मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५९७ दिनांक १४/११/२०२५**

मानधनावरील कनिष्ठ अभियंता यांची मानधनावर ६ महिने कालावधीकरीता नियुक्ती करण्यात आली होती. त्यानुसार त्यांची ०६ महिने कालावधीची नियुक्ती दि. २/११/२०२५ रोजी संपुष्ठात येत आहे.

तरी खालील मानधनावरील कनिष्ठ अभियंता यांनी पुढील ०६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ मिळणे बाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे व त्याबाबत संबंधीत विभाग प्रमुखांनी त्यांना मुदतवाढ देणेबाबत शिफारस केलेली आहे.

तरी मंजुर कार्यालयीन टिपणीनुसार उक्त मानधनावरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंड करुन एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिन्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार मुदतवाढ देणेबाबतचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाला व प्रस्तावानुसार धुळे महानगरपालिकेतील प्रस्तावात नमूद अ.क्र. १ ते १० मानधनावरील कनिष्ठ अभियंता यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६२० मानधनावरील लिपीक टंकलेखक (कॉम्प्युटर ऑपरेटर) यांना ६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक ५ दिवसांचीसेवा खंड देवुन मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५९८ दिनांक १४/११/२०२५**

मानधनावरील लिपीक टंकलेखक (कॉम्प्युटर ऑपरेटर) यांना रु. १७,०००/- मात्र एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीकरीता आदेशात नमुद अटी व शर्तीस अधिन राहून नियुक्ती देण्यात आली होती.

प्रस्तावित मानधनावरील लिपीक टंकलेखक (कॉम्प्युटर ऑपरेटर) यांचा ६ महिने मानधनाचा कालावधी दि. १७/११/२०२५ व दि २५/११/२०२५ रोजी संपुष्ठात येत आहे.

तथापी प्रस्तावित मानधनावरील लिपीक टंकलेखक (कॉम्प्युटर ऑपरेटर) यांनी पुढील ६ महिनेकरीता एकत्रित मानधनावर फेर नियुक्ती मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

तसेच खालील नमुद मानधनावरील लिपीक टंकलेखक (कॉम्प्युटर ऑपरेटर) यांना ६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधनावर फेर नियुक्ती मिळणेबाबत संबंधीत विभाग प्रमुखांनी शिफारस केलेली आहे.

तरी मंजुर कार्यालयीन टिपणीनुसार उक्त मानधनावरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंड करुन एकत्रित मानधनावर पुढील ०६

महिन्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(३) नुसार मुदतवाढ देणेबाबतचा विषय मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाला व प्रस्तावानुसार धुळे महानगरपालिकेतील प्रस्तावात नमूद अ.क्र. १ ते २० मानधनावरील लिपीक टंकलेखक यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मुदत संपल्याच्या दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६२१ केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना सन 2025-26 भाग X Urban planning reforms अंतर्गत X (B) Digital Intervening For Improved Governance-B-१, GIS Based Utility Mapping (Water, Sewerage and storm water) ची माहिती केंद्र शासनाच्या गतीशक्ती पोर्टलला अपलोड करणे बाबत झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांच्या विशेष सहाय्य योजना सन २०२५-२६ मध्ये शासनामार्फत सुचना देण्यात आली होती. त्यामुळे सदरचे काम करणे आवश्यक होते. त्याकरीता सदरचे काम शिवाजी ठाकरे, संगणक अभियंता यांच्यामार्फत करुन घेण्यात आले आहे. तरी कार्योत्तर मान्यतेस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यात आले आहे.
त्यात वॉटर सप्लाय, स्टॉर्म वॉटर, ॲडमिनीस्ट्रेशन बाऊंड्री, रोड नेटवर्क ची माहिती अपलोड करणे आवश्यक होते.

मा.आयुक्त तथा प्रशासक ७ लाखाला कसे जस्टीफाय करणार. रेट वगैरेचा बेस कसा ठेवला होता.

मा.उपअभियंता याबाबत पत्र आले होते. कोटेशन करुन ते काम केले होते. तत्कालीन आयुक्त महोदयांनी ७ लाखाला मान्यता दिली होती. त्यात डाटा एन्ट्रीची कामे होती ते काम १५ ते २० दिवस चालते. यात ॲप तयार करुन दिले होते.

मा.आयुक्त तथा प्रशासक या प्रस्तावाची फाईल मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांच्याकडुन तपासुन घ्या. जर मेहनताना बरोबर असेल तर आपण मंजुर करु. आपल्याला जस्टीफीकेशन देता आले पाहिजे कारण याला डीएसआर रेट नाही आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५९९ दिनांक १४/११/२०२५**

केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना सन 2025-26 भाग X Urban planning reforms अंतर्गत X (B) Digital Intervening For Improved Governance-B-१, GIS Based Utility Mapping (Water, Sewerage and storm water), B२, mapping of municipal assets and digital inventory of all government land बाबत प्रस्ताव विहित कालावधीत करणे बाबत निर्देशित केले आहे.

त्या अनुषंगाने B-१, GIS Based Utility Mapping ( Water, Sewerage and storm water) बाबतीत केंद्र शासनाने अमृत योजने अंतर्गत व नागरी व्यवहार मंत्रालय (MoHUA) मे- 2016 , मध्ये प्रकाशित केलेल्या डीझाईन व मानांकन नुसार तयार करून केंद्र शासनाचे पीएमगती शक्ती पोर्टलवर अपलोड करण्याबाबत सूचना निर्गमित केलेल्या आहेत, तसेच या पूर्वी केंद्र शासना कडून निर्देशित B१ बाबत Baseline Date ची माहिती या पूर्वी देण्यात आलेली आहे.

केंद्र शासनाने अमृत योजने अंतर्गत व नागरी व्यवहार मंत्रालय (MoHUA) मे- 2016 , मध्ये प्रकाशित केलेल्या डीझाईन व मानांकन नुसार संचालनालयाने महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र (MRSAC) नागपूर यांचे मदतीने B१ , GIS based utility Mapping ( Water , Sewerage and storm water) करीता Blank geospatial database तयार केले असून पाठविण्यात आलेले आहे. तरी आपल्या हद्दीमधील Capex अंतर्गत Baseline Data

मध्ये नमूद नमूद केलेल्या माहितीप्रमाणे , संचालनालयाने दिलेल्या डेटाबेस मध्येच storm water , water supply , sewer व्यतिरिक्त administration Boundary , Road Network ची माहिती dmapmgatishakti@gmail.com या ई-मेल वर सदर करावी, जेणे करून सदर माहितीची Quality Checking करून संचालनालयास केंद्र शासनाच्या पीएमगती शक्ती पोर्टल ला माहिती अपलोड (host) करता येईल याबाबत तांत्रिक अधिकारी संगणक अभियंता यांच्या समवेत संपर्क साधावा असे कळविले आहे.

तांत्रिक अधिकारी श्री.शिवाजी ठाकरे , संगणक अभियंता , नगरपरिषद लोणार (MRSAC , नागपूर ) व पीएमगती शक्ती कामी नेमणूक असलेले कन्सल्टन्ट यांच्या समवेत भ्रमणध्वनीद्वारे चर्चा करण्यात आली. सदरील संगणक अभियंता यांनी सुचविल्याप्रमाणे पीएमगती शक्ती च्या कामासाठी नेमणूक केलेल्या कन्सल्टन्ट मार्फत प्रत्येक Features , type नुसार classify करणे ई. स्वरुपाची माहिती त्यांनी दिलेली आहे.

उक्त बाबत संचालनालयाने दिलेल्या डेटाबेस मध्येच storm water, water supply, sewer व्यतिरिक्त administration Boundary , Road Network ची माहिती केंद्र शासनाने अमृत योजने अंतर्गत गृहनिर्माण व नागरी व्यवहार मंत्रालय (MoHUA) मे- 2016 , मध्ये प्रकाशित केलेल्या डीझाईन व मानांकन नुसार तयार करणे बाबत झालेल्या भ्रमणध्वनी नुसार श्री.गजानन बनसोडे, सिव्हील कॉन्ट्रक्टर , छत्रपती संभाजीनगर संभाजीनगर इच्छुक असून सदर कामासाठी रक्कम रु.7.00 लक्ष खर्च अपेक्षित असल्या बाबत कळविले आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजना सन 2025-26 भाग X Urban planning reforms अंतर्गत X (B) Digital Intervening For Improved Governance-B-१, GIS Based Utility Mapping (Water, Sewerage and storm water) ची माहिती केंद्र शासनाच्या गतीशक्ती पोर्टलला अपलोड करणे बाबत झालेल्या खर्च रुपये 7.00 लक्ष मात्रला कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तावात नमूद केलेला खर्च व दराबाबत म. मुख्यलेखापरीक्षक व म. मुख्यलेखाअधिकारी यांच्याकडून तपासणी करुन खात्री करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६२२ — हरीत महाराष्ट्र समृध्द महाराष्ट्र २०२५ अंतर्गत बांबू लागवडीसाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस्त आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्या. अधिक्षक (वृक्ष) — धुळे मनपा सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात हरीत महाराष्ट्र समृध्द महाराष्ट्र २०२५ अंतर्गत धुळे मनपाला ५० हजार रोपे लागवडीचे उदिदष्ट देण्यात आले होते. त्यापैकी आपण १४ टप्पयांमध्ये ४८ हजार रोपे मियावाकी पध्दतीने लावले आहेत. विषय क्र.६२२, ६२३, ६२४ हे तीनही माझे विषय याच स्वरुपाचे आहे. सदरचे रोपे वनविभागाकडुन मोफत मिळवले होते. रोपे ऑगस्ट मध्ये प्राप्त झाल्यामुळे रोपे लावल्यास उशिर झाला व तत्कालीन आयुक्तांनी सांगीतल्याप्रमाणे तात्काळ रोपे लावली गेली. त्यात गुगल शीट ला दर सोमवारी माहिती भरुन दयावी लागत होते.

मा.आयुक्त तथा प्रशासक — प्रती रोप लावल्याचे बिल किती दिले आहे.

मा.कार्या. अधिक्षक (वृक्ष) — हे जे रोपे लावण्याचे बिल एसएसआर मध्ये पब्लीक वर्क डिपार्टमेंट विभागाचे एसएसआर सुची २ नुसार केले आहे. तरी प्रति रोप रु. १००/- लावण्याचा खर्च आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — कसे लावले व त्यांनी काय काय केले.

कार्या. अधिक्षक (वृक्ष) — त्यांनी खत आणुन जेसीबी च्या सहाय्याने खडडे खोदुन, माती खाली वर करण्यासाठी मशिन मागविले होते. तसेच ते वर्ष वृक्षांची देखभाल करणार आहे. यातील १०० रोपे जगले आहेत.

मा.आयुक्त तथा प्रशासक ऑगस्ट मध्ये वृक्ष लागवड झाली आहे मग त्या रक्कमेला मंजुरी योग्य वाटत नाही.

मा.कार्य. अभियंता यातील सगळे दर हे शासकीय दरसुचीतले आहे. हॉल्टीकल्चर चा जो जीएसआर आहे त्यातले दरानुसारच माझ्याकडुन एस्टीमेट बनवले गेले आहे. त्यात आपण ब्लॅक सॉईल मॅन्युअल, एस्टॅब्लीशन अ‍ॅण्ड मेंटेनिंग फॉर सर्टन पिरीएड याचे इन्क्युडिंग रेट आहे. यात मंजुरी आता आपल्याला द्यावी लागेल. आणि याचे पेमेंट मात्र पार्ट पेमेंट करावे लागेल.

मा.आयुक्त तथा प्रशासक त्यांनी याकरीता स्टाफ ठेवला आहे का.

मा.कार्या. अधिक्षक (वृक्ष) त्यांनी ४-५ माणसे नेमुण दिले आहे. तसेच त्यांनी सांगीतले फिडर करुन दिले तर वृक्ष जगण्याचे प्रमाण जास्त राहिल.

मा.आयुक्त तथा प्रशासक त्यांची हजेरी दरमहा घ्यावी. आणिरु. १००/- प्रत वृक्ष खर्च याप्रमाणे त्यांनी आपल्याला खात्री दिली असेल तर मेंटेनन्ससाठी जो स्टाफ लागतो तो रुटींग मेंटेनन्सची त्यांची जबाबदारी राहिल वर्षभरासाठी, यात दरांना मान्यता देणेत येत आहे. पेमेंट पुटअप करतांना पार्ट पेमेंट करावे. तसेच झाडे जगली नाही तर दंडात्मक कार्यवाही होईल. तसेच हा विषय देखील ६७(३) क मध्ये बसत नाही याला ५(२)(२) मध्ये बसवावे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६०० दिनांक १४/११/२०२५**

धुळे महानगरपालिका सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात हरीत महाराष्ट्र समृध्द महाराष्ट्र २०२५ अंतर्गत रोपे लागवडीचे उद्दिष्ट पुर्ण करणेकरीता अक्कलपाडा जलशुध्दीकरण केंद्र, धुळे, कंपोस्ट डेपो वरखेडी रोड, धुळे या जागा निवडण्यात आल्या होत्या. सदर जागेवर १०,००० वेगवेगळया बांबू लागवड करण्यात आली. सदर रोपे लावण्याचे काम दिपाली नर्सरी अ‍ॅण्ड मल्टीसर्व्हिसेस, धुळे यांना देण्यात आले होते. सदर काम झाल्याने पब्लीक वर्क डिपार्टमेंटचे विभागाचे पार्क अ‍ॅण्ड गार्डन एस.एस.आर दर सूची २०२२-२३ नुसार खालीलप्रमाणे बिल सादर केले आहे.

| अ.क्र | कामाचा तपशिल | रोपांची संख्या | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | Planting Bamboo trees at water treatment plant at akkalpada dhule, and maintain it. | 3000 | 3,51,883/- |
| 2 | Providing, planting bamboo trees at campous of akkalpada WTP dhule. | 3000 | 3,51,883/- |
| 3 | Maintening garden (4000 BAMBOO) plants At Compost Depo At, Dhule | 4000 | 4,69,177/- |

तसेच सदरचे काम तातडीचे असल्याने संचालक, दिपाली नर्सरी अ‍ॅण्ड मल्टीसर्व्हिसेस, धुळे यांचा मागील अनुभव पाहता त्यांच्याकडून बाजार भावाप्रमाणे काम करुन घेण्यात आलेले आहे. त्यानुसार कार्योत्तर मान्यता मिळणेस स्थायी समितीपुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, हरीत महाराष्ट्र समृध्द महाराष्ट्र २०२५ अंतर्गत बांबू लागवडीसाठी झालेल्या खर्च रुपये ११,७२,९४३/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

उक्त प्रस्तावात नमूद वृक्षांचे संगोपन व देखभाल करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची असल्यामुळे सदर संस्थेस पहिल्या टप्प्यात ५० % रक्कम देण्यात यावी. तसेच १ वर्षानंतर वृक्षांच्या स्थितीनुसार उर्वरीत देयके अदा करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६२३ हरीत महाराष्ट्र समृध्द महाराष्ट्र २०२५ अंतर्गत मियावाकी पध्दतीने रोपे लागवड करणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक या विषयात ही समान सुचना आहेत. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६०१ दिनांक १४/११/२०२५**

धुळे महानगरपालिका सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात हरीत महाराष्ट्र समृध्द महाराष्ट्र २०२५ अंतर्गत रोपे लागवडीचे उद्दिष्ट पुर्ण करणेकरीता शिक्षण महर्षी दादासाहेब रावल शासकिय तंत्रनिकेतन देवपुर, धुळे येथे २ एकर जागा उपलब्ध झाली होती. सदर जागेवर मियावाकी पध्दतीने २०,००० वेगवेगळया प्रकारची रोपे पाच टप्प्यात लावण्यात आली. सदर रोपे लावण्याचे काम दिपाली नर्सरी ॲण्ड मल्टीसर्व्हिसेस, धुळे यांना देण्यात आले होते. सदर काम झाल्याने पब्लीक वर्क डिपार्टमेंटचे विभागाचे पार्क ॲण्ड गार्डन एस.एस.आर दर सूची २०२२-२३ नुसार खालीलप्रमाणे बिल सादर केले आहे.

| अ.क्र | कामाचा तपशिल | रोपांची संख्या | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | Tree plantation work as demanded by principal of polytechnique college in deopur in their open place premices at dhule. | 4,250 | 4,98,500/- |
| 2 | Maintening garden ३००० plants (SHISHU, NIM, BOR, KHAIR, KARANJ, KANCHAN, CHINCH, SITAFAL, AAVLA, KUSUM) At government technical college premices At, Dhule | 3000 | 3,51,883/ |
| 3 | Providing, planting and maintain trees at campous of polytechnique college dhule | 4,250 | 4,98,500/ |
| 4 | Providing, planting various trees at govt polytechnic premices dhule | 4,250 | 4,98,500/ |
| 5 | Plantation of various trees like NIM, KANCHAN, KARANJ, SITAFAL, etc. as directed by horticulture department DMC. | 4,250 | 4,98,500/ |

तसेच सदरचे काम तातडीचे असल्याने संचालक, दिपाली नर्सरी ॲण्ड मल्टीसर्व्हिसेस, धुळे यांचा मागील अनुभव पाहता त्यांच्याकडून बाजार भावाप्रमाणे काम करुन घेण्यात आलेले आहे. त्यानुसार कार्योत्तर मान्यता मिळणेस स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, हरीत महाराष्ट्र समृध्द महाराष्ट्र २०२५ अंतर्गत बांबू लागवडीसाठी झालेल्या खर्च रुपये २३,४५,८८३/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

उक्त प्रस्तावात नमूद वृक्षांचे संगोपन व देखभाल करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची असल्यामुळे सदर संस्थेस पहिल्या टप्प्यात ५० % रक्कम देण्यात यावी. तसेच १ वर्षानंतर वृक्षांच्या स्थितीनुसार उर्वरीत देयके अदा करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६२४ हरीत महाराष्ट्र समृध्द महाराष्ट्र २०२५ अंतर्गत मियावाकी पध्दतीने रोपे लागवड करणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक विषय क्रं. ६२३ व ६२४ या विषयांत रकमा मोठया आहेत. प्लांटेशनसाठी एवढा खर्च येत नाही यात प्लांट जगवण्याचा खर्च मी गृहीत धरतो. यात ४० ते ५० टक्के रक्कम मी

रिलीज करेल व झाडे जगल्यावर मी बाकीची रक्कम मी रिलीज करणार आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६०२ दिनांक १४/११/२०२५**

धुळे महानगरपालिका सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात हरीत महाराष्ट्र समृध्द महाराष्ट्र २०२५ अंतर्गत रोपे लागवडीचे उद्दिष्ट पुर्ण करणेकरीता एस.आर.पी.एफ गट क्र. ६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन साक्री रोड, धुळे, कंपोस्ट डेपो वरखेडी रोड, धुळे या जागा निवडण्यात आल्या होत्या. सदर जागेवर मियावाकी पध्दतीने १२,५००/- वेगवेगळया प्रकारची रोपे लावण्यात आली. तसेच विदयावर्धिनी सभेच्या साक्री रोड वरील महाविदयालयाच्या मोकळया आवारात ५००० रोपे लावण्यात आले. सदर रोपे लावण्याचे काम दिपाली नर्सरी ॲण्ड मल्टीसर्व्हिसेस, धुळे यांना देण्यात आले होते. सदर काम झाल्याने पब्लीक वर्क डिपार्टमेंटचे विभागाचे पार्क ॲण्ड गार्डन एस.एस.आर दर सूची २०२२-२३ नुसार खालीलप्रमाणे बिल सादर केले आहे.

| अ.क्र | कामाचा तपशिल | रोपांची संख्या | एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | Manintening garden 3000 plants (SHISHU, NIM, BOR, KHAIR, KARANJ, KANCHAN, CHINCH, SITAFAL, AAVLA, KUSUM) At Dr. Babasaheb Ambedkar samajik nyay bhavan At, Sakri road Dhule. | 3000 | 3,51,883/- |
| 2 | Manintening garden 2500 Plants (SHISHU, NIM, BOR, KHAIR, KARANJ, KANCHAN, CHINCH, SITAFAL, AAVLA, KUSUM) At Compost Depo At, Dhule | 2500 | 2,93,236/- |
| 3 | Providing, planting and maintaining trees near surat bypass highway at SRPF GAT NO, 6 DHULE | 3500 | 4,10,530/- |
| 4 | Tree plantation work as directed by tree auothority DMC at SRPF GAT NO, 6 campus dhule. | 3500 | 4,10,530/- |
| 5 | Manintening garden 3000 plants (SHISHU, NIM, BOR, KHAIR, KARANJ, KANCHAN, CHINCH, SITAFAL, AAVLA, KUSUM) At Vidyavardhini collage At, Sakri road Dhule. | 2500 | 2,93,226/- |
| 6 | Tree plantation work as directed by tree auothority DMC at Vidyavardhini collage At, Sakri road Dhule. | 2500 | 2,93,226/- |

तसेच सदरचे काम तातडीचे असल्याने संचालक, दिपाली नर्सरी ॲण्ड मल्टीसर्व्हिसेस, धुळे यांचा मागील अनुभव पाहता त्यांच्याकडून बाजार भावाप्रमाणे काम करुन घेण्यात आलेले आहे. त्यानुसार कार्योत्तर मान्यता मिळणेस स्थायी समितीपुढे सादर करण्यात आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, हरीत महाराष्ट्र समृध्द महाराष्ट्र २०२५ अंतर्गत बांबू लागवडीसाठी झालेल्या खर्च रुपये २०,५२,६३१/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

उक्त प्रस्तावात नमूद वृक्षांचे संगोपन व देखभाल करण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची असल्यामुळे सदर संस्थेस पहिल्या टप्प्यात ५० % रक्कम देण्यात यावी. तसेच १ वर्षानंतर वृक्षांच्या स्थितीनुसार उर्वरीत देयके अदा करावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६२५ महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२५-२६ वलवाडी इंद्रपस्थ कॉलनी येथील खुल्या जागेत सभागृह बांधणेकामी निविदा दर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्य. अभियंता महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हा नगरोत्थान योजनेअंतर्गत सन २०२५-२६ वलवाडी इंद्रप्रस्थ कॉलनी येथील खुल्या जागेत सभागृह बांधणे बाबत काही मा. जिल्हाधिकारी सो. यांनी आर्थिक प्रशासकीय मान्यता दिली आहे. उक्त कामी निविदा मागविण्यात येवुन त्यात ३ ठेकेदारांनी भाग घेतला होता. त्यात मे. आदर्श कन्स्ट्रक्शन यांची शे. ०.९९ टक्के कमी दराने सर्वात कमी दराची निविदा आली असुन मे. स्थायी समितीसमोर दर मान्यतेसाठी सादर केला आहे. विषय मंजुरीस हरकत नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६०३ दिनांक १४/११/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत सन 2025-26 वलवाडी इंद्रप्रस्थ कॉलनी येथील खुल्या जागेत सभागृह बांधणे बाबतच्या कामास मा. जिल्हाधिकारी सो.धुळे यांनी क्रमांक 12/क/कक्ष-5/नपाप्र/बांध/946/2025 दि.29/10/2025 नुसार उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.49,98,556/-मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत कार्यकारी अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.193/2025 दि.14/10/2025 अन्वये रक्कम रु. 49,98,556/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून खालीलप्रमाणे निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | सौरभ संजय कदमबांडे | शे.३% जास्तीने | |
| **२** | **मे.आदर्श कन्सट्रक्शन** | शे.०.९९% कमीने | **सर्वात कमी दर** |
| ३ | भूषण एल चौधरी | शे.२% जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे.आदर्श कन्सट्रक्शन यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे 49,49,072/- इतक्या रक्कमेचे असून शे.0.99% कमीने दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे. आदर्श कन्सट्रक्शन यांचे दर शे.0.99% कमीने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे. आदर्श कन्सट्रक्शन यांची शे.0.99% कमीने आलेले निविदा दर प्रस्ताव मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२५-२६ वलवाडी इंद्रपस्थ कॉलनी येथील खुल्या जागेत सभागृह बांधणे कामी मे.आदर्श कन्सट्रक्शन यांच्या शे.0.99% कमी दराने या आलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६२६ महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत सन 2025-26 देवपुर भागातील स.नं. 28/2 येथील मनपा मालकीच्या आरक्षीत जागेवर कमर्शिअल कॉम्प्लेक्स व भाजी मंडईचे बांधकाम करणे (भाग 1) कामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्य अभियंता महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हा नगरोत्थान योजनेअंतर्गत सन २०२५-२६ देवपुर भागातील मनपा मालकीच्या जागेवर कर्मशियल कॉम्प्लेक्स सिसनं. २८/२ भाजी मंडई बांधकाम करणेकामी मा. जिल्हाधिकारी सो. यांनी आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिली आहे. ई निविदा मागविण्यात येवुन त्यात मे. मिलींद मुडावदकर यांची अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी दराची निविदा आली असुन मे. स्थायी समितीसमोर दर मान्यतेसाठी सादर केला आहे. विषय मंजुरीस हरकत नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६०४ दिनांक १४/११/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत सन 2025-26 देवपूर भागांतील सयेथील मनपा मालकीच्या आरक्षित जागेवर कमर्शियल कॉम्प्लेक्स व28/2 नं.. भाजी मंडईचे बांधकाम करणे (भाग 1( बाबतच्या कामास मा. जिल्हाधिकारी सो.धुळे यांनी क्रमांक 12/क/कक्ष-5/नपाप्र/बांध/946/2025 दि.29/10/2025 नुसार उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.९,९९,९९,६११/-मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत कार्यकारी अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.186/2025 दि.08/10/2025 अन्वये रक्कम रु. ९,९९,९९,६११/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून खालीलप्रमाणे निविदा दर सादर केलेली आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | बी.आर.भदाणे बिल्डकॉन LLP | शे.५% जास्तीने | |
| **२** | **मे.मिलिंद मुडावदकर** | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे.मिलिंद मुडावदकर यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ९,९९,९९,६११/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रकीय दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.मिलिंद मुडावदकर यांचे दर अंदाजपत्रकीय आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.मिलिंद मुडावदकर यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव प्रस्ताव मे. स्थायी समिती पुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२५-२६ देवपूर भागांतील येथील मनपा मालकीच्यसर्व्हे नं 28/2 येथील आरक्षित जागेवर भाजी मंडईचे बांधकाम करणे (भाग १) कामी मे.मिलिंद मुडावदकर यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६२७ महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत सन 2025-26 देवपुर भागातील स.नं. 28/2 येथील मनपा मालकीच्या आरक्षीत जागेवर कर्मशिअल कॉम्प्लेक्स बांधकाम करणे (भाग 2) कामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्य. अभियंता सदरचा विषय देखील याच स्वरुपाचा आहे. यात भाग २ आहे. त्यात देखील मे. मिलींद मुडावदकर यांची अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी दराची निविदा आली असुन मे. स्थायी समितीसमोर दर मान्यतेसाठी सादर केला आहे. विषय मंजुरीस हरकत नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६०५ दिनांक १४/११/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत सन 2025-26 देवपूर भागांतील सयेथील मनपा मालकीच्या आरक्षित जागेवर28/2 नं.. कमर्शियल कॉम्प्लेक्सचे बांधकाम करणे (भाग 2) बाबतच्या कामास मा. जिल्हाधिकारी सो.धुळे यांनी क्रमांक १२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/९४६/२०२५ दि.२९/१०/२०२५ नुसार उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.४,९९,९९,६२५/-मात्र रक्कमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत कार्यकारी अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.१८७/२०२५ दि.०८/१०/२०२५ अन्वये रक्कम रु. ४,९९,९९,६२५/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्तबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून खालीलप्रमाणे निविदा दर सादर केलेली आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | बी.आर.भदाणे बिल्डकॉन LLP | शे.५% जास्तीने | |
| **२** | **मे.मिलिंद मुडावदकर** | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे.मिलिंद मुडावदकर यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ४,९९,९९,६२५/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रकीय दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.मिलिंद मुडावदकर यांचे दर अंदाजपत्रकीय आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.मिलिंद मुडावदकर यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव प्रस्ताव मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२५-२६ देवपूर भागांतील मनपा मालकीच्या सर्व्हे नं. 28/2 या आरक्षित जागेवर कमर्शियल कॉम्प्लेक्सचे बांधकाम करणे (भाग २) कामी मे.मिलिंद मुडावदकर यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६२८ — प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना पांझरा नदी किनारी सोलर उर्जा प्रकल्प उभारणेकामी निविदा दर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता (वि) — पांझरा नदीकिनारी येथे सोलर प्रकल्प उभारणे कामी १०० टक्के अनुदान प्राप्त होणार आहे. याबाबत प्रशासकीय मान्यता मा.जिल्हाधिकारी सो. यांच्या कार्यालयाकडुन प्राप्त झाली आहे. यात १५ केव्हीपी चे ५ सोलर पार्क करणार आहेत. आणि ५ केव्हीपी चे १० सोलर पार्क असे एकुण १५ हुन अधिक सोलर पार्क होणार आहेत. हे पांझरा नदी किनारी म्हणजे गार्डनच्या समोरील भाग व इतर मुख्य ठिकाणे येथे आहेत. त्या ठिकाणी ही कामे होणार आहे. मे. समरविलपावर व इन्फा्र. प्रायव्हेट लिमीटेड धुळे यांचे दर इस्टीमेट पेक्षा कमी आहेत. सदर इस्टीमेट TW CSR प्रमाणे आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६०६ दिनांक १४/११/२०२५**

पांझरा नदी किनारी सोलर उर्जा प्रकल्प उभारणे. [प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना सन २०२५- २६ निधी] उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र. दि. / /२० मा. आयुक्त/ उपायुक्त धुळे महानगरपालिका / मा. जिल्हाधिकारी सो. यांची प्रशासकीय मान्यता यांच्याकडील प्रशासकीय मान्यता आदेश क्र.

जीनिस/O/गोख/DMF/कावि /१२७/२०२५ दि.१२/०८/२०२५ अन्वये अन्वये रोजी अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु. १,४९,९७,५१६/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा मागविणेत आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत Online पद्धतीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.प्रगती इंजिनिअरिंग वर्क्स ,धुळे | शे. +३.५० जास्त दराने | |
| २ | मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे | शे. -०.०१ कमी दराने | L1 |
| ३ | मे अंबिका इलेक्ट्रीकल्स ,धुळे | शे. +२ जास्त दराने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता ठेकेदार मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच रु. १,४९,९६,०१७/- इतक्या रकमेची असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे. -०.०१ कमी दराने आहे.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून ठेकेदार मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांचे दर अंदाजपत्रकीय / कमी / जास्त आहेत. त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार मे. समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांची रक्कम रु. १,४९,९६,०१७/- अंदाजपत्रकीय / शे.-०.०१ कमी / जास्त दराने आलेले निविदा दर मान्यतेसाठी प्रस्ताव मे. स्थायी समिती पुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना पांझरा नदी किनारी सोलर उर्जा प्रकल्प उभारणेकामी मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांचे शे. -०.०१ कमी दराने आलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६२९ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२५-२६ अंतर्गत कै.युवराज अण्णा यांच्या घराजवळील गो शाळेच्या भिंती लगतच्या नाल्यास संरक्षण भिंत व स्लब कल्वर्ट करणे कामी निविदा दर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हा नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत सन २०२५-२६ कै. युवराज आण्णा यांच्या गोशाळेच्या भिंतीलगतच्या नाल्यास संरक्षक भिंत व स्लॅब कल्व्हर्ट करणे कामी मा. जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडुन आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. ई निविदा मागविण्यात येवुन त्यात ३ निविदा धारकांनी भाग घेतला होता. तयात मे. एकविरा कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी दराची निविदा आली असुन मे. स्थायी समितीसमोर दर मान्यतेसाठी सादर केला आहे. विषय मंजुरीस हरकत नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६०७ दिनांक १४/११/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत कै.युवराज अण्णा यांच्या घराजवळील गो शाळेच्या भिंती लगतच्या नाल्यास संरक्षण भिंत व स्लब कल्वर्ट करणे बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र क्रमांक १२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/९४६/२०२४-२५ दि.२९/१०/२०२५ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. **७९,९९,६०५/-** मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत कार्य.अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./**१९५**/२०२४-२५ **दि.१४/१०/२०२५** अन्वये रक्कम रु. **७९,९९,६०५/-** मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.एकविरा कन्सट्रक्शन | अंदाजपत्रक दर | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.आशिष एम.पटवारी | शे. २.०० % जास्तीने | |
| ३ | मे. श्री.स्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे. ३.०० % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/**मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे **७९,९९,६०५/-** इतक्या रक्कमेचे असून **अंदाजपत्रकीय** दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/**मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ **मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव प्रस्ताव मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत कै.युवराज अण्णा यांच्या घराजवळील गो शाळेच्या भिंती लगतच्या नाल्यास संरक्षण भिंत व स्लब कल्वर्ट करणे कामी श्री/**मे.एकविरा कन्सट्रक्शन** यांचे **अंदाजपत्रकीय** दरास मान्यता देणेत येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६३० महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२५-२६ अंतर्गत देवपूर भागातील गीता नगर येथील नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामी निविदा दर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्य. अभियंता महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हा नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत सन २०२५-२६ देवपुर भागातील गीतानगर येथील नाल्यास संरक्षण भिंत बांधणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मा. जिल्हाधिकारी सो. यांच्या कार्यालयाकडुन प्राप्त झाली आहे. सदर कामी ई निविदा मागविण्यात येवुन त्यात मे. ए.के. सैफी यांची सगळयात कमी दराची निविदा प्राप्त झाली आहे. मे. स्थायी समिती समोर दर मान्यतेसाठी सादर केला आहे. विषय मंजुरीस हरकत नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६०८ दिनांक १४/११/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२५-२६ अंतर्गत देवपूर भागातील गीता नगर येथील नाल्यास संरक्षण भिंत बांधणे बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र क्रमांक १२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/९४६/२०२४-२५ दि.२९/१०/२०२५ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ४९,९७,५८१/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत कार्य.अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./**१९४**/२०२४-२५ दि.१४/१०/२०२५ अन्वये रक्कम रु. ४९,९७,५८१/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.अे.के.सैफी | अंदाजपत्रक दर | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.भूषण एल.चौधरी | शे. २.०० % जास्तीने | |
| ३ | मे. सौरभ संजय कदमबांडे | शे. ३.०० % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/मे.अे.के.सैफी यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ४९,९७,५८१/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रकीय दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ **मे.अे.के.सैफी** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ **मे.अे.के.सैफी** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर. तसेच कलम ४५२ अ च्या (१अ ) नुसार मे.स्थायी समिती पुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२५-२६ अंतर्गत देवपूर भागातील गीता नगर येथील नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामी श्री/**मे.अे.के.सैफी** यांचे अंदाजपत्रकीय दराने आलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६३१ — महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत दसेरा मैदान जलकुंभाच्या बाजूला नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामी निविदा दर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्य अभियंता — महाराष्ट्र सुवर्ण जयंती जिल्हा नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत सन २०२५-२६ दसेरा मैदान जलकुंभाच्या बाजुला नाल्यास संरक्षक भिंत बांधणेकामी मा. जिल्हाधिकारी सो. यांच्याकडेस प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा. जिल्हाधिकारी सो. यांनी आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर ई निविदा मागविण्यात येवुन त्यात मे. सौरभ संजय कदमबांडे यांची सगळयात कमी दराची निविदा प्राप्त झाली आहे. मे. स्थायी समितीसमोर दर मान्यतेसाठी सादर केला आहे. विषय मंजुरीस हरकत नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक — सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६०९ दिनांक १४/११/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत दसेरा मैदान जलकुंभाच्या बाजूला नाल्यास संरक्षण भिंत बांधणे बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र क्रमांक १२/क/कक्ष-५/ नपाप्र/ बांध/ ९४६/२०२४-२५ दि.२९/१०/२०२५ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. १,६९,८१,७३५/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत कार्य.अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१९६/२०२४-२५ दि.१४/१०/२०२५ अन्वये रक्कम रु. १,६९,८१,७३५/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत या धुळे महानगरपालिका जा.क्र./धुमपा/बां.वि./**७५**/२०२५-२६ अन्वये दि.३०/१०/२०२५ रोजी दैनिक पुण्यनगरी/लोकमत (राज्यस्तरीय) या वृत्तपत्रात जाहिर निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.१०/११/२०२५ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत.

पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. सौरभ संजय कदमबांडे | अंदाजपत्रक दर | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.भूषण एल.चौधरी | शे. २.०० % जास्तीने | |
| ३ | मे. आदर्श कन्सट्रक्शन | शे. ५.०० % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे.सौरभ संजय कदमबांडे यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे १,६९,८१,७३५/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रकीय दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ **मे.सौरभ संजय कदमबांडे** यांचे दर **अंदाजपत्रकीय** आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ **मे.सौरभ संजय कदमबांडे** यांची **अंदाजपत्रकीय** दराने आलेले निविदा दर प्रस्ताव मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत दसेरा मैदान जलकुंभाच्या बाजूला नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामी **मे.सौरभ संजय कदमबांडे** यांचे **अंदाजपत्रकीय** दराने आलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६३२ धुळे शहरातील पाणीपुरवठा वितरण व्यवस्था तसेच पाणीवापर याबाबत उचित मुल्यमापन होणेसाठी जलमापके व संगणकीय देखभाल यंत्रणा बसविणेकामी निविदा दर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्य. अभियंता — धुळे शहरात सद्यस्थितीत ४१ जलकुंभाव्दारे आपण पाणीपुरवठा करतो. यासाठी पाणीपुरवठा इरिगेशन विभागाकडुन घेतो व किती पाणी पुरवठा घरोघरी करतो याचे मोजमापासाठी व्यवस्था नाही.सदर व्यवस्था व्हावी व एकाच जागी सर्व कंट्रोलिंगसाठी निविदा प्रसारित करण्यात आली होती. त्यावेळी त्यात ३ ठेकेदार आले होते. परंतु त्यात इंम्पॅक्टीकल दर आल्यामुळे ती निविदा रदद करावी लागली आणि फेरनिविदा करावी लागली.

मा. आयुक्त तथा प्रशासक — याबाबत त्यांचा लेखी खुलासा घेवुन अमान्य केला होता का.

मा.कार्य. अभियंता — हो लेखी खुलासा घेवुन स्थायी समिती मध्ये अमान्य करण्यात आला होता. आणि फेरनिविदा केली त्यात २ एजन्सी आल्या होत्या. त्यातली एक पात्र झाली आहे. जी पात्र झाली आहे. जी पात्र झाली मे. सिमकॉन सॉफ्फटवेअर (इं) प्रा. लि. तयांचे निविदा दर ७.५ टक्के जास्तीने आले आहेत. परंतु वाटाघाटीकरीता बोलविले असता त्यांनी सदर दर कमी करुन ३.५ टक्के जास्तीने काम करण्यास तयारी दर्शविली आहे. दर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर, हा सेकंड कॉल होता.

मा.कार्य. अभियंता — सदरील कामाची मुदत १२ महिने राहणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — आणि हि सिस्टीम बसविल्यानंतर त्यांच्याकडे ऑपरेशन आणि मेंटेनन्स राहणार.

मा.कार्य. अभियंता — नाही ऑपरेशन आणि मेंटेनन्सची आपली प्रोव्हिजन राहणार आहे. परंतु आपल्या इस्टीमेट मध्ये प्रोव्हिजन आहे. पुढील ३ वर्षे त्याने मेंटेनन्स करावे पण त्याचे सेपरेट करावे लागेल. यात ते पेमेंट समाविष्ट केलेले नाही.

मा.आयुक्त तथा प्रशासक — यात तो ३.५ % जास्तीने आहे. जास्तीने असल्याचे कारण काय.

कार्य. अभियंता यात फलो कंट्रोल विभाग आहे त्यात बदल झाले आहे. पुर्वीचे दर व आताचे दर यात बदल झाले आहे. तसेच सॉफटवेअरचे रेट वाढले आहे. हे इस्टीमेट २ वर्षापुर्वीचे आहे. त्याकरीता डिफरन्स येत आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात एक सुचना अशी की ही रक्कम मोठी आहे. तर बजेट प्रोव्हीजन नुसार काम करावे. आणि पुढील आर्थिक वर्षात सुध्दा प्रोव्हिजन करावी. जेवढी प्रोव्हिजन असेल तेवढे काम होईल. यात एक मोठा तोटा असतो जेव्हा आपण असे कंत्राट देतो तेव्हा ते खुप मोठया प्रमाणात मशिनरी आणुन टाकतात आपल्याकडे जेणेकरुन त्याचे बिल पटकन निघेल आणि मोठी रक्कम त्याची रिलीज होईल. तसे यात होता कामा नये. यात तुम्ही असे प्लॅनिंग करावे की ते प्रत्यक्ष वापराचे बिले गेले पाहिजे असे बिलींगचे पॅटर्न करावे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६१० दिनांक १४/११/२०२५**

धुळे शहरातील पाणी पुरवठा वितरण व्यवस्था तसेच पाणी वापर या बाबत उचित मूल्यमापन होण्यासाठी जलमापके व संगणकीय देखभाल यंत्रणा बसविणे. उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सो. यांची रक्कम रु. ८,३०,७५,४१४/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १. | M/s Cimcon Software (India) Pvt Ltd., Ahmedabad | ७.५ टक्के जास्तीने | L१ |

M/s Cimcon Software (India) Pvt Ltd., Ahmedabad यांची निविदा ८,९३,०६,०७०.०५/- इतक्या रकमेची असुन ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.५% आहे.

सदर कामी निविदेत ठेकेदार M/s Cimcon Software (India) Pvt Ltd., Ahmedabad यांचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.५% असल्याने जा.क्र./धुमपा/पा.पु./८९२ दिनांक १३/११/२०२५ नुसार सदर निविदा धारकास दर वाटाघाटी करिता दिनांक १३/११/२०२५ रोजी ४:०० वाजता म. कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात उपस्थित राहून ७.५% चे दर ४% ने कमी करून ३.५% (रु. ८,५९,८३,०५३/-) करून देण्यात आले आहेत.

सदर कामी निविदेत ठेकेदार M/s Cimcon Software (India) Pvt Ltd., Ahmedabad यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार/मत्तेदार M/s Cimcon Software (India) Pvt Ltd., Ahmedabad यांनी वाटाघाटी अंती चे आलेले निविदा दर मे. स्थायी समितीपुढे सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे शहरातील पाणीपुरवठा वितरण व्यवस्था तसेच पाणीवापर याबाबत उचित मुल्यमापन होणेसाठी जलमापके व संगणकीय देखभाल यंत्रणा बसविणेकामी M/s Cimcon Software (India) Pvt Ltd., Ahmedabad यांचे ३.५% जास्तीने या दरास मान्यता देणेत येत आहे.

सदरचे कामाबाबत अर्थसंकल्पीय तरतूद तपासून काम करावे. पुढील आर्थीक वर्षात अर्थसंकल्पात याकामाबाबत आवश्यक ती तरतुद करण्यात यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६३३ धुळे मनपा क्षेत्रातील पांझरा नदी पूर्व पश्चिम किनार उत्तरेकडील भाग वलवाडी, भोकर, नकाणे, नगाव हद्दीपर्यंत संपूर्ण देवपूर भागातील सद्यस्थितीत असलेले पथदिवे देखभाल दुरुस्ती करणेकामी दर मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता (वि.) याबाबत शहर व देवपुर भागामध्ये निविदा केली होती. पैकी देवपुर भागाचे काम असमाधानकारक होते. मागील २ महिन्यांपासुन ठेकेदार काम करत नसल्यामुळे आपण त्या भागाची निविदा केली होती. आता आलेले दर आहे ते पुर्वीच्या मंजुर दरापेक्षा ७% कमीने निगोशिएट केले आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक अत्यावश्यक बाब म्हणुन हे मंजुर करतोय पण तीनही भागामध्ये हे काम थांबले आहे. देखभाल दुरुस्तीचे त्याबाबत नागरीकांच्या खुप तक्रारी असतात. ज्यांना आपण नेमतोय त्या स्पिडने त्यांनी कामही केले पाहिजे. मागील कंत्राटदारांना सुचना द्याव्या. काल जी VC झाली त्यामध्ये सुचना आहे की, शासनाने जी एजन्सी नियुक्त केली त्या बरोबरचे अॅग्रीमेंट लवकर करावे. तर पुढील स्थायी समितीत तो विषय येईल हे पहावे. मग याचा व त्याचा ताळमेळ कसा करायचा ते विभागाने ठरवावे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६११ दिनांक १४/११/२०२५**

धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठरावानुसार ई निविदा काढणेस मान्यता देण्यात आली आहे. उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा मागविणेत आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत Online पद्धतीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

सदरच्या निविदेनुसार खालील प्रमाणे निविदा धारकांची दर प्राप्त आहेत.

1.मे.ओम श्री मंगलमूर्ती इले.& Contractor, नाशिक

2.मे.सुराज इले.& Contractor, नाशिक

3.मे.पंचकृष्ण इलेक्ट्रिकल सर्विसेस नाशिक

Financial Bid उघडली असता BOQ तक्ताद्वारे वरील निविदाधारक पैकी L१ निविदाधारक मे.ओम श्री मंगलमूर्ती इले. & Contractor, नाशिक यांचे दर कमी असून अंदाजपत्रकीय रक्कम नुसार जास्त असल्याने त्यांना धुमपा/पत्र/विवि/ २३४दि. १३/११ /२०२५ नुसार दर बाटाघाटी साठी कळविणेस आले आहे. निविदाधारक मे. ओम श्री मंगलमूर्ती इले. & Contractor, नाशिक यांच्या दि.१३/११/२०२५ च्या पत्रानुसार त्यांनी दिलेले दर कमी करून १ ते ५६ बाबींसाठी सुधारीत दर दिले आहेत.

मे.ओम श्री मंगलमूर्ती इले.& Contractor, नाशिक यांचे दर हे दर वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय रक्कम नुसार ७% कमी आहेत. सदरील वर जी.एस.टी दरांसह आहेत. तथा मक्तेदारास सदरचे दर २ वर्ष मुदतीकरीता बंधनकारक आहेत.

सदरच्या निविदेमध्ये निविदाधारकांकडून मागविलेल्या दरामध्ये निविदाधारकांने प्रत्यक्ष एल.ई.डी पथदिवा काढणे व त्यांची दुरूस्ती मुदतीमध्ये करणे या साठीचे दर मागविले असून मक्तेदारास दुरूस्ती काम झाल्यावर व पाहणी झाल्यावर कामाचे देयक दिले जाणार आहे. यापुर्वीच्या निविदा कार्यपध्दती मध्ये मनपा कडुन लमसम पध्दतीने सर्व पथदिव्यासाठी वार्षीक दर करार पध्दत होतो तसेच सदरच्या निविदा बाबी १ ते ५६ मध्ये मक्तेदारास आवश्यक व तातडीच्या सर्व दुरुस्त्या करणे तसेच टायमर बसविणे च्या कामासह अन्य स्ट्रीट लाईट कन्डक्टर ओढणे भुमिगत केबल सौरचना सुधारणा करणे तसेच सुरक्षित करण्याच्या बाबी अंतभुतं आहे.

सदरच्या निविदा कामामध्ये मक्तेदारास पथदिवे देखभाल दुरूस्ती विलंबाने करणे तसेच लाईन फॉल्ट दुरूस्ती विलंबाने करणे या करीता दंडात्मक कार्यवाही अटी शर्ती बंधनकारक असून निविदेच्या सर्व शर्ती मक्तेदारास बंधनकारक आहे. तथा मक्तेदाराने सदरच्या दराच्या वाटाघाटी मध्ये त्यांना सदरचे काम देखभाल दुरूस्तीचे असल्याने प्रती माहा देयक मिळण्या बाबतची बाब नमूद करून त्या शर्तीवर सदरचे कार्म उक्त नमूद दरामध्ये करण्याबाबत लेखी पत्र सादर केले आहे.

उक्त धुळे मनपा क्षेत्रातील पांझरा नदी पूर्व पच्छिम किनार उत्तरेकडील भाग वलवाडी, भोकर, नकाणे, नगाव हद्दीपर्यंत संपूर्ण देवपूर भागातील सद्यस्थितीत सदयास्थितीत असलेले

पर्थादिवे देखभाल दुरूस्ती करणे व उर्वरीत ठिकाणी नवीन एल.ई.डी पथदिवे लावणेच्या कामा करीता मे.ओम श्री मंगलमूर्ती इले.& Contractor, नाशिक यांचे उक्त प्रमाणे २ वर्ष मुदती करीता दर करार मंजुर करण्यासाठी म. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार धुळे मनपा क्षेत्रातील पांझरा नदी पूर्व पश्चिम किनार उत्तरेकडील भाग वलवाडी, भोकर, नकाणे, नगाव हद्दीपर्यंत संपूर्ण देवपूर भागातील सद्यस्थितीत असलेले पथदिवे देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.ओम श्री मंगलमूर्ती इले.& Contractor, नाशिक यांचे प्रस्तावात नमूद १ ते ५६ बाबींसाठी वाटाघाटी अंती आलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमे नुसार ७% कमी दरास तसेच बाब क्रमांक 2 चे दर रुपये ३७८६ मात्रने मान्यता देणेत येत आहे.

तथापी शासनाने राज्यस्तरावर 2 कंपन्यांशी पथदिवे देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी करार केलेला असून त्या कंपन्यांचे मंजूर दर व आपण आपल्या स्तरावर करीत असलेल्या कामांचे मंजूर दर तसेच त्यानुसार येणारा वार्षीक खर्च याबाबत अहवाल तयार करावा तसेच त्याबाबत तुलनात्मक मुल्यांकन करुन पुढील मे. स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर करावा. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६३४ धुळे महानगरपालिका कार्यालयाकरिता मानधन तत्वावर लिपीक-टंकलेखक ची पदे भरणेकरिता जाहिरात प्रसिध्द करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्या. अधिक्षक २५ पदे भरणेबाबत प्रक्रिया करायची आहे. धुळे मनपात नियत वयोमानानुसार लिपीक कर्मचारी सेवानिवृत्त झालेले व होत असल्याने विभागांमध्ये लिपीक कर्मचाऱ्यांची संख्या अल्प प्रमाणात असल्याने कामकाजात अडचणी निर्माण होत आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यांची सिलेक्शन प्रोसेस पारदर्शक ठेवा. यात मेरीटनुसार सिलेक्शन होईल. कोठेही हस्तक्षेप करण्यास स्कोप राहणार नाही याची दक्षता घ्यावी. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६१२ दिनांक १४/११/२०२५**

धुळे महानगरपालिकेमध्ये विविध विभागांमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचे कामकाज सुरु आहे. तसेच सदर योजनांचे माहिती तयार करणे, गुगल शीट, वेळोवेळी बैठकींकरिता पीपीटी तयार करणे इ. कामकाज, तसेच धुळे महानगरपालिकेतील नियत वयोमानानुसार लिपीक कर्मचारी सेवानिवृत्त झालेले व होत असल्याने, विभागांमध्ये लिपीक कर्मचाऱ्यांची संख्या अल्प प्रमाणात असल्याने कामकाजामध्ये मोठ्या प्रमाणावर अडचणी निर्माण होत आहे.

तसेच सद्यस्थितीत धुळे महानगरपालिका सार्वत्रिकक निवडणूक 2025 करिता शासनाने पूर्वतयारीचे कार्यक्रम जाहिर केलेला असून, आगामी निवडणूकीच्या कामाकाजाच्या अनुषंगाने निवडणूक निर्णय अधिकारी, तसेच इतर अनुषंगीक कार्यालयीन कामकाजासाठी लिपीक टंकलेखक यांची आवश्यकता आहे.

तसेच विविध विभागांकडून वारंवार लिपीक टंकलेखकांची उपलब्धता कमी असल्याने मनुष्यबळाची मागणी होत असते.

मा.आयुक्त सो यांनी समक्ष दिलेल्या निर्देशानुसार लिपीक टंकलेखक मानधनवार तातडीने भरण्याबाबत खालीलप्रमाण प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

शासन मान्य आकृतीबंधानुसार धुळे महानगरपालिकेकरिता खालीलप्रमाणे लिपीक-टंकलेखक ची पदे मंजूर व रिक्त आहे.

| अ.क्र. | पदनाम | एकूण मंजूर पदे | सरळसेवेने मंजूर पदे | सरळसेवेने भरलेली पदे | मानधनावर कार्यरत | सरळसेवेची रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लिपीक | २६५ | १३३ | ७८ | २३ | ३२ |

सुधारित सेवाप्रवेश नियमानुसार खालीलप्रमाणे अर्हता नमूद आहे:-

अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी.

ब) राज्य शासनाची मराठी टंकलेखक 30 श.प्र.मि. (जी.सी.सी.) इंग्रजी टंकलेखन 40 श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.

क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत M.S.C.I.T. किंवा D.O.E.A. C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C. C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उतीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक.

ड) मराठी, हिंदी, वाचता लिहीता व बोलता येणे आवश्यक.

त्याअनुषंगाने लिपीक-टंकलेखाच्या एकूण 32 रिक्त पदांपैकी 25 पदे 06 महिने कालावधीकरिता एकत्रित मानधन रु.15,000/- मात्र मानधनावर भरणेकरिता प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व प्रस्ताव विचारात घेता, पुढील सार्वत्रिक निवडणुक कामी असलेली मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेता, धुळे महानगरपालिका कार्यालयाकरिता मानधन तत्वावर लिपीक-टंकलेखक ची पदे भरणेकरिता जाहिरात प्रसिध्द करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर प्रक्रीया व कार्यवाही तात्काळ व पारदर्शक रितीने करण्यात यावी. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

**मे. स्थायी समिती बैठकी प्रसंगी मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दिलेले निर्देश**

१. यापुढे तातडीच्या कामांसाठी कलम ६७ (३) क चा वापर करु नये अत्यावश्यक कामांसाठी दर पत्रक मागवविण्यात यावे.

२. आरोग्य विभागाचे काम संथ गतीने होत आहे. रस्त्यांवरील मातीचे ढिगारे व मुख्य रस्ते व चौक तातडीने स्वच्छ करावे.

३. अग्निशमन विभागामाफ्रत आठवडयातील एक वार ठरवुन शहरातील सर्व पुतळे स्वच्छ करण्यात यावे.

४. आरोग्य विभागामाफ्रत विशेष स्वच्छता मोहिम राबवुन आदिशक्ती श्री एकविरा देवी मंदीर परीसर व मंदीराकडे येणारे सर्व रस्ते स्वच्छ करावे. तसेच व्यापारी व बाजारपेठ भागात रात्री कचरा संकलनासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. व्यापारी व बाजारपेठ भागातील कचरा संकलनासाठी सायंकाळच्या वेळेत घंटागाडया कार्यरत राहतील याबाबत नियोजन करावे तसेच व्यापारी पेठ भागात संबंधितांना डस्टबिन ठेवण्यासंदर्भात सुचना द्याव्यात. सदर कार्यवाही तातडीने आंमलात आणावी.

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**